# औद्योगिक क्रांती घडून येण्याच्या मार्गावर

**मुंबई** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेला 'मेक इन इंडिया' उपक्रम विविध क्षेत्रांत क्रांती घडवून आणण्याच्या मार्गावर असल्याने त्याचा फायदाच होणार आहे, मात्र त्याचा प्रभावीपणा वाढण्यासाठी अजून काही गोष्टींची उणीव पूर्ण करणे गरजेचे आहे, असे मत क्वाण्टम हायटेकचे संचालक आशिष मुटनेजा यांनी व्यक्त केले आहे.

आयातीमधील अंडर इन्व्हॉयसिंगचे (आहे त्या किमतीपेक्षा कमी किंमत) प्रमाण कमी झाले तरच लघु व मध्यम उद्योगांचा विकास होईल, हे सर्वश्रुत आहे. हे साध्य करण्यासाठी परवाने प्रक्रिया अधिक अवघड करणे, सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ वापरात नसलेले आयातीचे परवाने रद्द करणे व आयात-निर्यातीसाठी असलेला एकच परवाना वेगवेगळा करणे अशा पद्धती वापरता येतील, असेही आशिष मुटनेजा यांनी म्हटले. ते पुढे म्हणाले की, ही समस्या दुहेरी बाजू असलेली आहे, कारण भारतात अंडर इन्व्हॉयसिंग तर चीनमध्ये ओव्हर इन्व्हॉयसिंग होते. त्यासाठी भारत व चीनचे सामाईक क्लीअरन्स सर्व्हर असणे गरजेचे आहे, ज्यामुळे चीन व भारत एकाच किंमतीला वस्तूंचा व्यवहार करू शकतील. जर याची आपोआप अंमलबजावणी झाली तर खरेदीदार चिनी कंपन्या जास्त किंमत लावत नाही ना याची खात्री करतील आणि भारतीय कंपन्या कमी किंमत लावत नाही ना याची खात्री चिनी कंपन्या करतील. कस्टम कार्यालयाशी निगडित प्रशासकीय अडथळे कमी करण्यासाठी वसुली कार्यालयांतील भ्रष्ट वसुली एजंट्सच्या प्रवेशावर मर्यादा घालणे व ते साध्य करण्यासाठी कस्टम अधिकाऱ्यांचे पगार वाढवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आयआरएस पातळीवर तरुण लोकांची नेमणूक करणे, भ्रष्ट अधिकाऱ्यांना पकडून देणाऱ्या अधिकाऱ्यांना चांगले बक्षीस देणे, भ्रष्ट अधिकाऱ्यांना कडक शिक्षा देणे, कस्टम कार्यालयात व्हिडीओद्वारे देखरेख ठेवणे अशा गोष्टीही 'मेक इन इंडिया' उपक्रमात समाविष्ट करणे आवश्यक आहे.




उत्पादनास चालना मिळण्यासाठी छोट्या उद्योगांना यंत्रणा आयात करणे शक्य व्हावे म्हणून निर्यात कर आणि कच्च्या तसेच तयार उत्पादनांवरील व्याजदर कमी करणे, व्हीडीएस वापरून काळा पैसा मुख्य प्रवाहात आणणे, हाँगकाँगच्या धर्तीवर भारतात चांगल्या पायाभूत सुविधा, रस्ते असलेला परिसर निर्माण करणे, ज्यामुळे कारखान्यांनी तयार केलेला माल विकण्यासाठी ट्रेडर्सना मदत होईल. कारण आजच्या जगात सर्वच कारखान्यांकडे त्यांची उत्पादने विकण्यासाठी आवश्यक वेळ व कौशल्य असतेच असे नाही. अशा प्रकारच्या उपाययोजना अंमलात आणल्यामुळेही मेक इन इंडिया उपक्रमास फायदा होणार आहे.